राष्ट्रीय रोग सर्वेक्षण कार्यक्रमाच्या सन २०१८-१९ च्या मंजूर पीआयपीमधील उपलब्ध अनुदानातून जिल्हा रुग्णालय, सातारा, अमरावती, परभणी व ठाणे या ठिकाणी जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा (District Public Health Lab) विकसित करण्याकरीता उपकरणे खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-०३१९/प्र.क्र. २२३/आरोग्य -७

१० वा मजला, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४०००01.
दिनांक : ३१ मार्च, २०१९.

वाचा :-

सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग), पुणे यांच्याकडील पत्र क्र. ससंआसने/साथरोग/जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा/उपकरणे खरेदी/प्रशासकीय मान्यता/कक्ष-५८ आय.डी.एस.पी./४५८५-९०/२०१९, दिनांक ३० मार्च, २०१९.

प्रस्तावना :-

राष्ट्रीय रोग सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०१८-१९ च्या मंजूर पीआयपीमधील उपलब्ध अनुदानातून साथरोग सर्वेक्षणाच्या उद्दिष्टांसाठी जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा (District Public Health Lab) म्हणून विकसित करण्याचे प्रस्तावित असल्याने राज्यातील जिल्हा रुग्णालय, सातारा, अमरावती, परभणी व ठाणे या ठिकाणी जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा (District Public Health Lab) विकसित करण्याकरीता आवश्यक उपकरणे खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय रोग सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०१८-१९ च्या मंजूर पीआयपीमधील उपलब्ध अनुदानातून साथरोग सर्वेक्षणाच्या उद्दिष्टांसाठी जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा (District Public Health Lab) म्हणून विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने जिल्हा रुग्णालय, सातारा, अमरावती, परभणी व ठाणे या ठिकाणी “जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा” (District Public Health Lab) विकसित करण्याकरीता सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग), पुणे यांनी प्रस्तावित केल्यानूसार सदर ठिकाणी आवश्यक उपकरणे

खरेदी करण्यासाठी अंदाजित रक्कम रु.७४.६० लक्ष रकमेच्या निविदा प्रक्रिया करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सदर खरेदीकरीता येणारा अंदाजित खर्च रक्कम रु.७४.६० लक्ष हा सन २०१८-१९ मध्ये FMR Code ६.१.१.१५a (A budget of Rs.८३.१० Lakhs is approved for strengthening DPHLs in Satara, Chandrapur, Parbhani, Thane & Amravati in the Year २०१८-१९) अंतर्गत मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात येणार आहे. सदर उपकरणे व साहित्य खरेदीचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :-

अनुदानाचा तपशिल

Sr. no	FMR Code	Name of Head	Approved Budget in PIP in 2018-19 (In Lakhs)	Proposal for Procurement (In Lakhs)
1	6.1.1.15a 2018-19	A budget of Rs.83.10 Lakhs is approved for strengthening DPHLs in Satara, Chandrapur, Parbhani, Thane & Amravati in the Year 2018-19	83.10	Procurement of Equipment Amt. Approx. Rs.74.60 Lakhs

उपकरणे खरेदीचा तपशिल

Sr. No.	**Name of Equipment**	**Satara**	**Amravati**	**Parbhani**	**Thane**	**Total Qty.**	**Rate in Lakhs**	**Total Amt. in Lakhs**
1	Incubators	1	1	-	-	2	0.60	1.20
2	ELISA reader with printer	1	1	1	1	4	6.00	24.00
3	Elisa Washer	1	1	1	-	3	2.50	7.50
4	Weighining Scale & Mixer	1	1	1	1	4	0.50	2.00
5	Autoclave (Sterilization)	1	1	1	1	4	1.25	5.00
6	Autoclave (decontamination)	1	1	1	-	3	1.25	3.75
7	Computer Printer, Scanner, UPS,	1	1	1	1	4	1.00	4.00
8	Biosafety Cabinet	1	1	1	1	4	2.50	10.00
9	Binocular Microscopes	1	-	-	-	1	0.55	0.55
10	Deep Freezer (-20^{o}c)	1	1	1	1	4	3.20	12.80
11	Refrigerator (300 Ltrs)	-	1	1	-	2	0.20	0.40
12	Water Bath	-	-	1	-	1	0.40	0.40
13	Micro Pipette (0.2- 10ul, 20-200ul, 100-1000ul)	-	-	one Set of 6 Pipette		1	3.00	3.00
							Total	**74.60**

उपरोक्त प्रशासकीय मान्यता खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

१) सदर उपकरणे व साहित्यांची आवश्यकता / मागणी याची शहानिशा / खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) सदरहू उपकरणे व साहित्यांचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. तसेच, सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच याबाबींची खरेदी करण्यात यावी. पीआयपी मध्ये मंजूर असलेल्या बाबींच्या तांत्रिक विर्निदेशानुसार मागणीपत्र पाठविण्याची जबाबदारी संबंधीत कार्यक्रम प्रमुखांची राहिल. प्रस्तावातील समाविष्ट असलेल्या बाबींचीच खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतूदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती दर निश्चित करण्यात यावा. सदर दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व / पुरवठानंतर नमुना तपासणी (pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश (specification) असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच, पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) सदरहू खरेदीसाठी होणारा खर्च राष्ट्रीय आरोग्य अभियान मंजूर सन २०१८-१९ नुसार पीआयपी मध्ये उपलब्ध असलेल्या FMR Code 6.1.1.15a नूसार उपलब्ध रु.83.10 लक्ष इतक्या अनुदानातून भागविण्यात यावा.

८) तसेच, या बाबींच्या खरेदी द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

९) संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रिय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

११) खरेदी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर खरेदी समितीच्या मान्यतेनंतरच पुरवठा आदेश निर्गमित करण्यात यावेत.सदर प्रकरणी सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.खरेदी - २०१६/प्र.क.२४०/आरोग्य-८ दिनांक २६ जुलै,२०१७ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

३. उपरोक्त अनुक्रमांक १ ते १० येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई व संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई आणि सदरहू कार्यक्रम राबविणाऱ्या कार्यक्रम प्रमुख यांची राहील.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अनु क्रमांक ४, नियम क्र. ७ अन्वये अवजारे, किरकोळ साधन सामग्री आणि उपक्रम संच विकत घेण्यास मंजूरी देण्यासाठी प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानूसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

५. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. 201903281116408717 असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KIRAN VASANTRAO WAHUL

Digitally signed by KIRAN VASANTRAO WAHUL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=58e32592d7ee16b3f0ea3e5db304272db056899514ece7f762990f9b1a0c5049, postalCode=400001, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=2e35734ec976bf5657815fb42c4d25b0b3c23b4c69600638f3deb172ac9e37f4, ou=PHD, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KIRAN VASANTRAO WAHUL
Date: 2019.03.31 12:29:09 +05'30'

(किरण वाहुल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य संचालनालय, मुंबई.
३) अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
४) सर्व सह संचालक (आरोग्य सेवा संचालनालया मार्फत)
५) सर्व सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
६) उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये.
७) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक/ सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (FWB मार्फत)
८) निवडनस्ती (आरोग्य-७)